# कोल्हापुरात समकालीन विषयांवरील एकांकिकांचे सादरीकरण

## 'लोकसत्ता लोकांकिका'च्या प्राथमिक फेरीस जल्लोषात प्रारंभ



'लोकसत्ता लोकांकिका' स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे उद्घाटन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते झाले.

**'लोकसत्ता लोकांकिका'**

सॉफ्ट कॉर्नर
स्वप्न मनामनातलं । निसर्गाच्या सान्निध्यातलं ॥
presents
लोकसत्ता लोकांकिका
in association with
BHARATI VIDYAPEETH PUNE

**मुख्य प्रायोजक**
● सॉफ्ट कॉर्नर

**सहप्रायोजक**
● भारती विद्यापीठ, पुणे
● शिवरत्न शिक्षण संस्था, अकलूज संचालित विजयसिंह मोहिते-पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग अँड मेडिकल रिसर्च इन्स्टिट्यूट

**पॉवर्ड बाय :** ● केसरी टूर्स
● शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघ मर्या, विजयनगर-अकलूज, ता. माळशिरस जि. सोलापूर
● श्री नेमिनाथ ज्वेलर्स

**साहाय्य :** ● अस्तित्व

**टॅलेंट पार्टनर :** ● आयरिस प्रॉडक्शन

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** समकालीन विषयाला धाडसाने भिडणाऱ्या प्रभावी एकांकिका हे 'लोकसत्ता लोकांकिका'च्या कोल्हापूर केंद्रातील पहिल्या दिवसाचे वैशिष्ट्य ठरले. विषयाची उमज लक्षात घेत सादरीकरण केल्याने उगवत्या कलाकारांनी उपस्थितांची वाहवा मिळवली.

महाविद्यालयीन जगतात प्रतिष्ठेचे स्थान मिळवलेल्या 'लोकसत्ता लोकांकिका' स्पर्धेच्या प्राथमिक फेरीला आज येथील विवेकानंद महाविद्यालयात प्रारंभ झाला. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी नटराजाच्या प्रतिमेचे पूजन केले. विविध भागांतील कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणाऱ्या 'लोकसत्ता लोकांकिका' स्पर्धेला नाट्यवर्तुळात मानाचे स्थान मिळाले आहे. तरुणाईच्या या मंचाने ग्रामीण भागातील कला, गुणवत्ता महानगरात पोहचवली, असे डॉ. कुंभार म्हणाले.

या वेळी 'आयरिश प्रॉडक्शन'चे प्रतिनिधी अनुपम दाभाडे, महाविद्यालयाचे सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. अरिफ महात, एनएसएस प्रमुख प्रा. संदीप पाटील उपस्थित होते. 'लोकसत्ता'च्या वितरण विभागाचे व्यवस्थापक संदीप गिरी यांनी स्वागत केले.

पहिल्याच दिवशी शहर - ग्रामीण भागातील युवा विद्यार्थी - विद्यार्थिनींनी सादर केलेल्या लोकांकिकांमध्ये विविध सामाजिक विषयांवर मार्मिक भाष्य केले. कोल्हापुरातील

वा त्यांची जयंती साजरी करणे यापेक्षा ते समजून घेणे कसे आवश्यक आहे, हा विचार या एकांकिकेने नेटकेपणाने मांडला.

येथील महावीर महाविद्यालयाच्या 'निर्झर' या एकांकिकेत परिपूर्णतेच्या नादात आजची पिढी अपूर्णतेतले सौंदर्य कसे विसरतेय याचा उलगडा होत राहिला. स्थानिक शहाजी लॉ कॉलेजने 'जंगल जंगल बटा चला है'मध्ये आकाशाचा रंग कोणता या वादविवादातून निरागस जंगलाचे झुंडशाहीत कसे रूपांतर होते याचे दाहक चित्रण उभे केले.

ग्रामीण भागातील पहिली एकांकिका विठ्ठल पाटील कॉलेज, सलगरे यांनी 'अस्पर्श'द्वारा सादर केली. करोना काळात अनाथांची अवस्था, नाती तुटणे, रुग्णांची दयनीय अवस्था, रुग्णालयांचे हिशेबी वर्तन, मृतदेहांची विटंबना आणि एकूणच व्यवस्थेची दयनीय अवस्था याचे हृद्य चित्र या एकांकिकेत मांडले गेले.

येथील विवेकानंद कॉलेजने 'पार करो

शोषण, तिच्यावर सगळे घर चालवायचे या कर्मकथेची भेदक कहाणी या एकांकिकेतून मांडली गेली. 'पॉपिलॉन' या दत्ताजीराव कदम आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेजच्या (इचलकरंजी) एकांकिकेत समाजमाध्यम व नवी-जुनी पिढी यातला संघर्ष, तसेच समाजापेक्षा मुलांचे हित कशात आहे याचा विचार करणे कसे रास्त ठरते हा मुद्दा मांडला होता. याच महाविद्यालयाच्या दुसऱ्या चमूने तृतीयपंथीयांच्या वेदना मांडणारी 'माई' ही एकांकिका प्रभावीपणे सादर केली.



'निर्झर' एकांकिकेतील प्रसंग.



'जंगल जंगल बटा चला है' एकांकिकेतील प्रसंग.

(छाया - दीपक जाधव)